श्रीमती.लता अशोक बर्डे अंगणवाडी पर्यवेक्षिका,ए.बा.वि.से.यो.प्रकल्प—राहुरी यांचा अनाधिकृत गैरहजर कालावधीचा व निलंबन कालावधीचा निर्णय घेण्याबाबत..

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**महिला व बालकल्याण विभाग**
**जि.प. आदेश क्रं. एबाविसेयो/आस्था-१/ १४१ /२०२५**
**अहिल्यानगर दि.२४ /०२ /२०२५**

संदर्भ:-१) बाल विकास प्रकल्प अधिकारी राहुरी यांचा प्रस्ताव जा.क्रं. वशी/आस्था/८१/२०२४ दि. २०.६.२०२४

२) वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं सेनिवे १००१/१३०/सेवा-४ दिनांक २ जुन २००३

३) या कार्यालयाकडील आदेश,एबाविसेयो/ का-३ /३१० /२००९ अहमदनगर दि. २४.८.२००९

४) श्रीमती लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांची प्रशासकीय बदली आदेश क्रं. एबाविसे/ कार्या-३/ २४९/२००८ दि. ३१.५.२००८

५) या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. एबाविसेयो/ का-३/ ४०१/ २०१० अहमदनगर दि. ४.११.२०१०

६) या कार्यालयाचे आदेश क्रं एबाविसे/ का-१/ ४०२/२०१० अहमदनगर दि.४.११.२०१०

७) या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रं एबाविसे/ का-३/ ३३४/ २०२४/अहमदनगर दि.१.०७.२०२४

८) श्रीम. लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांचा खुलासा दि. ५.८.२०२४

९) या कार्यालयाकडील शुध्दीपत्रक क्रं एबाविसेयो / का-३ /५०३/ २०२४ अहमदनगर दि.३०.०९.२०२४

उपरोक्त विषयान्वये श्रीमती लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका ता. राहुरी यांचा सेवा निलंबन कालावधी व अनाधिकृत गैरहजेरी कालावधीचा निर्णय घेणेबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी राहुरी यांनी उपरोक्त संदर्भ क्रं. १ अन्वये प्रसताव सादर केलेला आहे.

डॉ सुजाता सानप तत्का. वैदयकीय अधिकारी बारगाव नांदुर ता. राहुरी यांचा अहवाल दि.१६.३.२००८ नुसार श्रीम. लता बर्डे हया शासकीय कार्यालयामध्ये येणाऱ्या तक्रारदारास उध्दटपणे अरेरावीची व अपशब्दाची उत्तरे देणे,बालविकास केंद्र डिग्रस येथे कामाच्या वेळेत उपस्थित न राहणे, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे विरुध्द अपशब्द वापरणे.तसेच अंगणवाडी कार्यालयात योजनेचे काम करुन घेणे ऐवजी इतर कामात हस्तक्षेप करणे इत्यादी अहवाल या कार्यालयास सादर केला होता.त्यासंदर्भात बाल विकास प्रकल्प अधिकारी पारनेर यांच्या चौकशी अहवालानुसार या कार्यालयाकडील आदेश क्रं. एबाविसेयो/का-३/३१० /२००९अहमदनगर दि. २४.८.२००९ नुसार श्रीमती. लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांना बदलीच्या ठिकाणी हजर न होता अनाधिकृत गैरहजर राहाणे, बारागाव नांदुर या गटाचा कार्यभार हस्तांतरीत न करता वरिष्ठांच्या आदेशाचा अवमान करणे या गैरवर्तनामुळे श्रीमती लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांचेविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हासेवा वर्तणूक नियम १९६७ (३) चा भंग केल्याने

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हासेवा ( शिस्त व अपिल) नियम १९६४ चा भाग (२) (३) नुसार दि. २४.८.२००९ पासून सेवा निलंबित करण्यात आलेले होते.

यासंदर्भात श्रीमती. लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांचे विरुध्द दोषारोप बजावण्यात आले होते. या कार्यालयाकडील आदेश क्र. एबाविसे/ का-३/ ४०२/२०१० अहमदनगर दि.४.११.२०१० नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प जामखेड येथे पुन:स्थापित करण्यात येऊन श्रीमती लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका दि. २०.११.२०१० रोजी पुन:स्थापित केलेल्या ठिकाणी मध्यान्हपूर्व हजर झालेल्या आहेत. सदर गैरवर्तनाबाबत या कार्यालयाकडील आदेश क्रं. एबाविसे/ का-३/४०१/अहमदनगर दि. ४.११.२०१० अन्वये श्रीमती लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी भविष्य कालीन वेतनवाढीवर परिणाम होईल अश्या रितीने बंद करण्याची शिक्षा अंतिम करण्यात आलेली आहे. श्रीमती. लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांचा अनाधिकृत गैरहजर कालावधी दि ४.६.२००८ ते दि २३.८. २००९ तसेच निलंबन कालावधी दि० २४.८.२००९ ते १९.११.२०१० आहे.

गैरहजर व निलंबन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (पदग्रहणअवधी स्वियेत्तरसेवा आणि निलंबन, बडतर्फ व सेवेतून काढून टाकणे यांच्या कालावधीतील प्रदाने) नियम ७२(५) नुसार सेवेच्या सर्व करिता निलंबन व अनाधिकृत गैरहजेरी कालावधी निश्चित करण्यासाठी या कार्यालयाकडील संदर्भ क्रं. ७ अन्वये श्रीम. लता बर्डे यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

श्रीमती.लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका राहुरी या कार्यालयाच्या का.दा.नो. नुसार संदर्भ क्रं ८ च्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा विचारात घेता त्यांचा अनाधिकृत् गैरहजर कालावधी मान्य करण्यात इतपत कोणताही खुलासा अथवा पुरावे नव्याने सादर केलेले नाहीत. त्यामुळे श्रीम. बर्डे यांचा खुलासा असमर्थनिय असल्याने तो अमान्य करण्यात येत आहे. तसेच या कार्यालयाकडील आदेश क्रं. एबाविसेयो/ का-३/ ४०१/ २०१०/ अहमदनगर दि. ४.११.२०१० अन्वये श्रीमती लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांच्या दोन वार्षिक वेतनवाढीवर परिणाम होईल अश्या रितीने बंद करण्याचे आदेश मंजुर आहेत. त्यामुळे निलंबन समर्थनिय ठरत आहे.

सबब महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (पदग्रहण अवधी..) मधील नियम ७२(५) पोटनियम(२) नुसार श्रीम. लता अशोक बर्डे अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचा दि. २४/०८/२००९ ते १९/११/२०१० हा निलंबन कालावधी सेवेच्या प्रयोजनार्थ निलंबन कालवधी म्हणुन धरण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्रं. सेनिवे १००१/ १३०/ सेवा -४ दिनांक ०२/ ०६/२००३ मधील परिशिष्ट एक मुद्दा क्र.३ मधील तरतुदीनुसार श्रीम. लता अशोक बर्डे पर्यवेक्षिका यांचा दिनांक ४/०६/२००८ ते २३/०८/२००९ हा अनाधिकृत गैरहजर कालावधी समर्थनिय नसलेल्या कारणास्तव रजेशिवाय अनुपस्थित असल्याने हा कालावधी संपुर्ण अनुपस्थिती अकार्यादिन (**Dies-non** ) म्हणुन नियमित करण्यात येत आहे. सदर आदेश जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रं------------------------------------------------------असा आहे.
2025022 4080003

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 24-02-2025 11:19:43

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अहिल्यानगर

प्रति,

१) श्रीमती लता अशोक बर्डे, अंगणवाडी पर्यवेक्षिका एकात्मिक बालविकास सेवा योजना राहुरी जि. अहिल्यानगर द्वारा बालविकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.प्रकल्प-राहुरी

२) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो. प्रकल्प राहुरी

२/- सदरच्या आदेशाची नोंद श्रीम. लता अशोक बर्डे अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचे मुळ सेवा पुस्तकात नोंद घेण्यात यावी. तसेच सदर आदेश बजावण्यात येऊन दुय्यम प्रतीवर श्रीम. लता अशोक बर्डे यांची स्वाक्षरी घेण्यात येऊन सदरची स्वाक्षरीत प्रत या कार्यालयास सादर करावी.

प्रत:-मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- निवड नस्ती